नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/10/2023 (शनिवार) सकाळ

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक ०७/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे देवलापार हद्दीतून टाटा योद्धा पिकअप क्र. MH- 40-BG- 9590 या वाहनात अवैद्यरित्या गोवंश जनावरे यांना कोंबून त्यांना नायलॉन दोरीने बांधून कत्तली करिता घेऊन जात आहे अशा मिळालेल्या माहिती वरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने हिवराबाजार येथे नाकाबंदी करून टाटा योद्धा पिकअप क्र. MH- 40-BG- 9590 चे वाहन चालकास थांबविण्याचा इशारा दिला असता सदर वाहन थांबवुन चेक केले असता आरोपी टाटा योद्धा पिकअप क्र. MH- 40-BG- 9590 चा चालक नामे– फाजील अहमद फैजल अहमद, वय २९ वर्ष, रा. लकडगंज कामठी याने आपले ताब्यातील वाहनात एकूण ११ गोवंश (गाई), बैल, कालवट, वासरू, एकुण किंमती १,४३,०००/– रु चे जनावरे क्रुर व निदर्यतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीच्या ताब्यातून १) एकूण ११ गोवंश (गाई), बैल, कालवट, वासरू, एकुण किंमती १,४३,०००/– रुपयाचा मुद्देमाल २) टाटा योद्धा पिकअप क्र. MH-40-BG-9590 किंमती ७,००,०००/– असा एकूण ८,४३,०००/– रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर जप्ती मुद्देमाल व आरोपी चालक यांचे विरुद्ध कलम ११(१) ड प्राणी सरंक्षण कायदा ५ (१) (।) प्राण्यास निर्दयतेने वागणूक अधिनियम सहकलम ४२९ भा. द. वी. अन्वये गुन्हा नोंद करणे कामी पो. स्टे. देवलापार यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार अमोल कुथे, रोशन काळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, शंकर मडावी, नितेश पिपरोदे, विपीन गायधने यांनी पार पाडली

## सुखा मोहाफुल आणि गुड ची मोहफूल सडवा रसायन तयार करण्यासाठी
## वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक ०७/१०/२०२३ रोजी पो.स्टे. रामटेक हद्दित स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना विश्वसनिय गुप्त बातमीदार मार्फत प्राप्त माहितीनुसार सोनालीका कंपणीचे ट्रॅक्टर संलग्न ट्रॉली मध्ये सुखा मोहफूल व गुड हा मोहफूल सडवा रसायन तयार करण्यासाठी वाहतूक करून नेत आहे. या खबरे वरून नगरघन किल्ला येथे नाकाबंदी करून ट्रॉली क्रमांक नसलेलीचा चालकाला थांबवुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव युवराज बंडूजी सव्वालाखे वय ३३ वर्ष रा. नगरधन ता. रामटेक असे सांगितले. त्याचे ताब्यातील सोनालिका कंपनीचे ट्रॅक्टर संलग्न ट्रॉली ची तपासणी केली असता त्यामध्ये १२ सुतळी बोरी मध्ये मोहाफुल रसायन सडवा तयार करण्यासाठी १) १२ सुतळी बोरी मध्ये प्रत्येकी ४० किलो प्रमाणे एकुण ४८० किलो सुखा मोहफुल एकूण किंमती २४,०००/— रु. २) १२ सुतळी बोरी मध्ये प्रत्येकी ४० किलो प्रमाणे एकूण ४८० किलो गुड एकूण किंमती २४,०००/— रु चा ३) ट्रॅक्टर संलग्न ट्रॉली क्रमांक नसलेला ट्रॅक्टर किंमती अंदाजे ५,००,०००/— रु असा एकूण ५,४८,०००/— रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर जप्त मुद्देमाल व आरोपी ट्रॅक्टरचा चालक यांचे विरुद्ध पो. स्टे. रामटेक कलम ६९ महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले असून पुढील कागदपत्रे पो. स्टे. रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार अमोल कुथे, रोशन काळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, शंकर मडावी, नितेश पिपरोदे, विपीन गायधने यांनी पार पाडली

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर